

Editor
Dr.Bapu G. Gholap

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका
विद्यावार्ता™

Marathwada Shikshan Prasarak Mandal's

Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon, Dist: Beed (MS)

(NAAC Re-Accredited 'A' Grade with CGPA 3.21)

Interdisciplinary National Conference on

"Social & Political Problems in India : Challenges & Remedies" (SPPICR-2022)

20th December 2022

Special Issue

Editor

Dr. G. T. Mokasare	Dr. A. S. Pentawar	Dr. G. K. Sanap
Convenor	Organizing Secretary	Principal

Co-Editor

Dr. N. K. Muley	Mr. B. R. Bodke	Dr. D. S. Shinde
Co-Convenor	Co-Convenor	Co-Convenor

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

INDEX

01) दुष्काळ निर्मूलनात जलयुक्त शिवार अभियानाची भूमिका: विशेष संदर्भ....
डॉ. शेषराव कनिराम राठोड, वैजापुर ||08

02) भारतीय जनता पक्ष व भारतीय राजकारण
प्रा. डॉ. साहेब राठोड, पाथरी ||14

03) पर्यटन : पर्यटनशास्त्रापुढील आव्हाने
प्रा. डॉ. बोचरे जे. एम., पाथरी जि. परभणी ||16

04) भारत आणि राष्ट्रीय एकात्मता
Dr. Hanumant Phatak, Baramati ||18

05) लोकशाही आणि लोकशाहीचे भवितव्य एक अध्ययन
प्रा. जोगदंड मकरंद बळीराम, घाटनांदूर, जि.बीड. ||22

06) शेतकऱ्यांची आंदोलन व कृषी चळवळ....
डॉ. शिवाजी सोमला पवार, भोकर जि. नांदेड ||27

07) मार्गदर्शक तत्वातील मानवी मुल्य : एक चिंतन
—डॉ. सुखदेव चव्हाण,पालम ||36

08) स्त्रीवादी चळवळ
प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम, घोडेगाव, जिल्हा. पुणे. ||38

09) भारतातील सामाजिक व राजकीय समस्या : आव्हाने व उपाय—मानवी हक्क
सौ. समुती पवन दंदाले, सुलतानपूर, जि. बुलढाणा. ||42

10) भारतातील वृद्धांच्या समस्या
प्रकाश साहेबराव काळवणे, औरंगाबाद ||45

11) मानवी हक्क आयोग अधिकार : कार्य
प्रा. श्रीनिवास काशीनाथराव राठोड, सकनूर तांडा, जि. नांदेड ||49

12) बेरोजगारीचे कारणे, उपाय आणि परिणाम — एक समाजशास्त्रीय अभ्यास
श्री. नवनाथ विश्वनाथ खेत्री, औरंगाबाद. ||51

http://www.printingarea.blogspot.com
www.vidyawarta.com/03

13) नक्षलग्रस्त भारत
प्रा राजेश अनंतराव कांबळे, चिंचोली, जी. औरंगाबाद ||55

14) बेरोजगारी एक समस्या
डॉ.एन.के.मुळे, आकाशनाथ दतात्राय बोरकर, माजलगांव, बीड ||57

15) सोशल मीडिया तथा आज का युवा
प्रा. डॉ. पवार विक्रमसिंह विजयसिंह, चिंचोली (लिं), जिला—औरंगाबाद ||63

16) भारतीय शेती आधारित उद्योग आणि समस्या
तौर अमोल अंकुशराव, रिधोरी, ता. माजलगाव जि.बीड ||66

17) कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारा लैंगिक छळ
गोविंद अनिलराव तांदळे ||69

18) बेरोजगारी एक समस्या व ऊपाय
सोमनाथ चंद्रभान मारकड, रामनगर जालना ||72

19) सोशल मिडिया आणि युवक सोशल मिडियाचा आजच्यातरुणाईवर झालेला परिणाम
डॉ. सीमा काशिनाथराव धुमाळ/एरंडे, औरंगाबाद ||75

20) खाजगीकरणाचे, जागतिकीकरणाचे परिणाम
डॉ. रंजना मधुकर कदम, अकोले, जि. अहमदनगर ||77

21) लिंगभेद विषमता, माता आरोग्य आणि बालकुपोषण यातील सहसंबंध
डॉ. भगवान सुरेश मनाळ, गंगापूर जिल्हा औरंगाबाद ||81

22) मराठवाड्यातील राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची भूमिका
डॉ. ज्ञानोबा बालासाहेब ढोबळे, आवटे शाम गंगाधर, अंबेजोगाई, जि. बिड ||87

23) इतिहास पुनर्लेखनाची समस्या आणि वंचितांचे इतिहास लेखन
प्रा. डॉ. दिलीप तुकाराम कदम, मारवड, जि. जळगाव ||91

24) भारतातील सामाजिक व राजकीय समस्या : आव्हाने व उपाय स्त्रीवादी चळवळ
अन्वय प्रशांत भोले, औरंगाबाद ||95

25) पक्षांतरबंदी कायद्याचा भारतीय राजकारणावरिल परिणाम व उपाय
रामेश्वर सिद्धेश्वर झोडगे, औरंगाबाद ||97

http://www.vidyawarta.com/03 www.vidyawarta.com http://www.printingarea.blogspot.com

26) नव लोकप्रशासन,
डॉ. शिंदे सुरेखा सदाशिवराव, कळमनुरी ||99

27) पद्श्री सिंधुताई सपकाळ एक आकलन
प्राचार्य. डॉ. संतोष तुकाराम कदम, म्हसवड ||104

28) लोकशाही आणि लोकशाहीचे भवितव्य
कृष्णा राजेभाऊ रासवे, सचिन सर्जेराव खेत्री, औरंगाबाद ||107

29) महिला चळवळीत 'स्त्रीवाद' या शाखेची भूमिका: एक अभ्यास
आर. पी. खिल्लारे, जि. जालना ||111

30) राजकीय नैतिकता
वाल्मीक बबनराव घोडके, औरंगाबाद ||114

31) राष्ट्रकुटकालीन प्रशासन व्यवस्था
गोधाजी सोपानराव कापसे, औरंगाबाद ||117

32) महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळ : एक अवलोकन
डॉ. कैलाश बद्रीनाथ माटे, बारामती, जि.पुणे. ||120

33) कौटुंबिक विलगीकरणामुळे वृद्धांमध्ये उदभवणाऱ्या समस्या
ज्ञानेश्वर बाबुराव लुटे, औरंगाबाद ||123

34) भारतातील ई–गव्हर्नन्स : व्याप्ती, आव्हाने आणि उपाय
जगदीश भागवत फड, औरंगाबाद ||126

35) पारधी समाजातील महिलांवरील हिंसाचार : पार्श्वभूमी आणि परिवर्तन
दिपाली शंकर वाघमारे, कराड ||133

36) भारतीय अर्थव्यवस्थेमधील बेरोजगारीची समस्या
प्रा. डॉ. गव्हाळे बी. व्ही., घोडेगाव, ता. आंबेगाव जि. पुणे ||138

37) मुलभूत हक्क व सर्वांना समान संधी
प्रा.डॉ. ठोंबरे एम.डी., पाथरी ||143

38) संविधानातील मानव अधिकाराचे मुल्य व जपवणूक
प्रा.काळे टि.एफ., पाथरी ||145

www.vidyawarta.com/03_http://www.printingarea.blogspot.com

39) मानवी हक्क
श्री. सुरवसे शिवाजी आप्पा, नांदेड. ||146

40) स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण विकास
भगवान राजेभाऊ गंडे, औरंगाबाद. ||149

41) भारतीय संस्कृती आणि संगीत
प्रा. डॉ. दिलीप साहेबराव दोडके, औरंगाबाद. ||154

42) आदिवासी विमर्श की परंपराएं
डॉ. परमेश्वर जिजाराव काकडे, औरंगाबाद. ||156

43) एक समान सर्वसमावेशक सामाजिक, आर्थिक वाढ
जाधव दिपक रमेश, औरंगाबाद ||160

44) बेरोजगारी एक राष्ट्रीय आव्हान : कारणे, प्रवृत्ती आणि उपाययोजना
जगदीश साबळे, परतूर जी. जालना ||164

45) ग्रामीण महिला सबलीकरणातील आव्हाने आणि संधी
धनवटे उज्वला साहेबराव, औरंगाबाद ||169

46) भारतीय लोकशाही आणि राजकीय पक्ष
डॉ. ज्योती रमेश कांबळे, कराड ||172

47) जागतिकीकरणा नंतर बदललेले ग्रामजीवन आणि बोलीं पुढील समस्या
सायली सुरेश पिलणकर, करंजाडे, पनवेल, जि. रायगड ||176

48) भारतातील सामाजिक व राजकीय समस्या : आव्हाने उपविषय : महिला विरूद्ध हिंसा
जयश्री सुखदेव बोराडे, साखळी बु., ता. जि. बुलडाणा ||180

49) ग्राम स्वच्छतेची समस्या व शासनाची भूमिका
लव्हाळे दत्ता रामनारायण, नांदेड ||186

50) स्पर्धा परिक्षांचे बदलते स्वरूप व विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने
राजेश चंद्रकांत शिंदे, रामनगर, जालना ||189

51) सामाजिक समस्या और समाधान
डॉ. विनोद श्रीराम जाधव, अम्बड, जिला—जालना ||194

www.vidyawarta.com/03_http://www.printingarea.blogspot.com

52) नागरीकत्व सुधारणा कायदा– देशा अंतर्गत सुरक्षे समोरील आव्हान.
प्रा. संदीप भानुदास गवते, मुक्रमाबाद, जि. नांदेड ||198

53) सद्यस्थितील भारतातील राजकीय पक्ष एक दृष्टिक्षेप
प्रा. डॉ. लोंढे वनमाला सोपानराव, घोणसी, जि. लातूर ||201

54) सु–प्रशासनातील प्रमुख प्रशासकाची नैतिक मूल्ये
डॉ. भालेराव जे. के., बीड ||205

55) नोकरशाहीची भूमिका
सुभाष किशनराव पोले, औरंगाबाद ||208

56) वाढती बेरोजगारी ही भारतातील गंभीर समस्या
पुष्पराज साबळे, औरंगाबाद ||212

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

08

स्त्रीवादी चळवळ

प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम
इतिहास विभाग,
बी.डी.काळे महाविद्यालय घोडेगाव
तालुका– आंबेगाव, जिल्हा. पुणे.

****

प्रत्येक सामाजिक चळवळींना जसा सुसंगत इतिहास असतो तसा इतिहास हा स्त्रीवादी चळवळींनाही लाभलेला दिसून येतो. १७८९ मधील फ्रेंच राज्यक्रांतीतून स्त्रीमुक्ती विचारांना निश्चित दिशा मिळाली. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तीन तत्त्वे फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिली व यातूनच स्त्री वर्गालाही जाग आली. याच पातळीवर स्त्रीवादी चळवळी उभ्या आहेत. थोडक्यात, स्त्रीवादी चळवळ म्हणजे अनेक छटा असलेल्या बहुविध संघटना, व्यक्ती, कल्पना यामधून व्यक्त होणाऱ्या स्त्रियांच्या बदलत्या भूमिकांशी निगडित असणारी सामाजिक चळवळ. यामध्ये मवाळ सुधारणावादी दृष्टिकोनापासून समाजात सर्वांगीण बदलापर्यंत विविध भूमिका असणाऱ्या सर्वांचा समावेश होतो. या सर्वांमध्ये दिसणारा एक समान दृष्टिकोन म्हणजे स्वत:ची जीवनपद्धती आणि व्यवसाय निवडण्यामध्ये स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. इसवी सन १८४८ ते १९१५ हा कालखंड स्त्री चळवळीचा पहिला टप्पा म्हणून ओळखला जातो. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून भारतातील एकोणिसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळ, विसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळ व स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीवादी चळवळीचा उहापोह केलेला आहे.

शोधनिबंधाची उद्दिष्टे –

१) स्त्रीवादी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद करणे.

२) एकोणिसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळीचे चिकित्सक विश्लेषण करणे.

३) विसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळीचा आढावा घेणे.

४) स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीवादी चळवळीचा मागोवा घेणे.

शोधनिबंधाची गृहितके –

१) भारतातील स्त्रीवादी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी फ्रेंच राज्यक्रांतीत पहावयास मिळते.

२) स्त्रियांसाठी सामाजिक सुधारणा या दृष्टिकोनातून एकोणिसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळ उदयास आली.

३) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या सक्रिय सहभागाने विसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळीला चालना मिळाली.

४) स्वातंत्र्योत्तर कालखंडात विभिन्न चळवळीं मधून स्त्रिया कृतीशीलपणे सहभाग घेऊ लागल्या.

संशोधनपद्धती –

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

स्त्रीवादी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी –

पश्चिमात्य देशातील स्त्रियांच्या चळवळीचा इतिहास पाहता १९ व्या शतकातील मतदान हक्काच्या चळवळीपासून सुरुवात करायला हवी असे वाटते. इंग्लंड आणि अमेरिकेतील कष्टकरी वर्गातील आणि मध्यमवर्गीय स्त्रियांनी मतदानाचा हक्क, शिक्षण, संपत्ती आणि समान कायदा यासाठी अत्यंत लढाऊ चळवळ उभी केली होती. औद्योगिक क्रांतीच्या उगमानंतर प्रत्येक व्यक्तीला जर मतदानाचा हक्क आहे तर स्त्रीला का नाही? अशी जाणीव घेऊन ही चळवळ उभारली गेली होती. मतदान हक्काच्या चळवळीनिमित्त स्त्रिया घराबाहेर पडल्या. तुरुंगात गेल्या. मुख्य म्हणजे आम्ही माणूस आहोत असे समूह म्हणून बोलू लागल्या होत्या. स्त्रीवादी चळवळीच्या सैद्धांतिक अधिष्ठानाची मांडणी करताना महाराष्ट्रातील स्त्रीवादी अभ्यासक व ज्येष्ठ कार्यकर्त्या प्रा. छाया दातार असे लिहितात की, ‘समाजातील एखादा घटक आपल्यावरील अन्याय ओळखून त्याचे निवारण करण्यासाठी मूलभूत संरचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी जेव्हा प्रयत्नशील होतो तेव्हा त्या प्रवाहाला, त्या व्यवहाराला चळवळ असे म्हणता येते.

वेगवेगळे अभ्यासक स्त्रियांच्या चळवळीचे वर्गीकरण आपापल्या तात्विक दृष्टिकोनाप्रमाणे करतात. त्यानुसार नीरा देसाई म्हणतात, स्त्रियांची चळवळ म्हणजे समानता आणि स्वातंत्र्य हे समान ध्येय मिळविण्यासाठी केलेला संघटित प्रयत्न होय. स्त्रियांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या निर्णायक बाबींविषयी संवेदनशीलता त्यामध्ये गृहीत धरलेली असते. एखादी संबंधित क्रिया उद्देशाकडे जाण्याच्या दृष्टीने विविध एककांमध्ये त्यांना बांधणारा आदर्शवादी धागा असावा लागतो.

एकोणिसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळ –

युरोपप्रमाणे भारतातही स्त्री स्वातंर्त्याची चर्चा घडून आली. आधुनिक भारतातील स्त्रीवादी चळवळीचा इतिहास चार दशके मागे पहावा लागतो. ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतात वसाहतवाद मूळ धरू लागला. वसाहतवादी काळापासूनच्या महाराष्ट्राच्या इतिहासावर नजर टाकली तरी महाराष्ट्राचा इतिहास हा प्राधान्याने सामाजिक चळवळींचाच इतिहास असलेला दिसून येतो. यादृष्टीने पाहता त्या काळातील महत्त्वाच्या चळवळी म्हणून स्त्रियांच्या चळवळी, शेतकरी चळवळी, दलित बहुजनांच्या चळवळी, मुस्लिम समाजातील चळवळी, आदिवासी चळवळी या काही महत्त्वाच्या चळवळींचा निर्देश करावा लागतो.

भारतातील स्त्रीवादी चळवळीच्या इतिहासाची मुळे १९ व्या शतकापर्यंत मागे जातात. भारतीय धर्मग्रंथांच्या वर्चस्वामुळे स्त्रियांचे जीवन अन्याय, अवहेलना यामध्येच कोंडून पडले होते. ब्रिटिशांच्या आगमनाने पाश्चात्य विचार भारतीय समाजात पसरू लागले होते. त्यामुळेच १९ व्या शतकात सर्व प्रांतामधून आंग्लशिक्षित तरुण पिढीने स्त्रियांच्या प्रश्नावर समाज सुधारणा चळवळीत भर दिलेला दिसतो. १९ व्या शतकातील चळवळी या स्त्रियांना काही हक्क मिळाले पाहिजेत या प्रश्नाभोवती उभारल्या गेल्या होत्या. काही पुरुष व जागरूक स्त्रिया यांच्या अनुकंपेवर आधारित स्त्री दास्यविमोचनाच्या व पुनरुज्जीवनवादी चळवळी पूर्ण शतकभर चालू होत्या. ब्रिटिश कालखंडात शिक्षणाला महत्त्व आल्याने पाश्चात्य स्त्रियांच्या तुलनेत भारतीय स्त्रिया अडाणी ठरल्या होत्या. अशा स्त्रियांना जागृत करण्यासाठी सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, डॉ. आनंदीबाई जोशी इत्यादी महाराष्ट्रातील स्त्रियांनी वेगवेगळ्या मार्गाने स्त्री जागृती सुरू केली. शाळा, महिलाश्रम अनाथाश्रम यामुळे स्त्रियांना व्यावसायिक शिक्षण मिळू लागले. त्यातून स्त्रियांच्या आर्थिक स्वावलंबनात वाढ होत गेलेली दिसते.

१९ व्या शतकात प्रामुख्याने बंगाल, महाराष्ट्राप्रमाणेच अखिल भारतीय पातळीवर मद्रास, हैदराबाद, उत्तरप्रदेश, आयर्लंड, इत्यादी प्रांतातही स्त्रीसुधारकांचे स्त्रीजागृती विषयक कार्य पहावयास मिळते. स्त्रियांना पशुत्वाच्या गर्तेतून बाहेर काढून मनुष्यत्व प्रदान करण्याचा शिक्षण हाच प्रभावी मार्ग आहे ही भावना आपल्या काव्यातून व्यक्त करताना सावित्रीबाई फुले असे म्हणतात की, ष्शूद्रांना सांगण्याजोगा आहे शिक्षण मार्ग हा, शिक्षणाने मनुष्यत्व येते पशुत्व हाटते पहा.

पुरुषाचे स्वातंत्र्य म्हणजे बाईची पराधीनता अशी परिस्थिती नसावी, हे स्त्रीस्वातंत्र्य चळवळीचे उद्दिष्ट १९ व्या शतकात ताराबाई शिंदे यांच्या मांडणीतून दिसून येते.

स्त्रीसुधारणेच्या कार्याला चालना मिळण्याच्या दृष्टीने पंडिता रमाबाईंची व्याख्यानेही प्रभावी ठरलेली दिसून येतात. या व्याख्यानातून त्यांनी स्त्री पुरुष समान हक्क व प्रतिष्ठा, स्त्री शक्ती, स्त्री संघटन या आजच्या काळात दिसणाऱ्या संकल्पना शतकापूर्वी निर्भीडपणे मांडलेल्या होत्या. व्याख्यानातून प्रबोधनाचे कार्य करताना पुरुषांमध्येही जागृती व्हावी या दृष्टीने त्यांनी निमंत्रण पत्रिकेत, आपल्या घरची एखादी स्त्री बरोबर आणणाऱ्या पुरुषालाच व्याख्यानाला प्रवेश दिला जाईल अशी अट घातलेली होती. ती अट काटेकोरपणे पाळली जात होती. त्यांच्या भाषणांमुळे स्त्रीमुक्तीवादी विचार वाढीस लागण्यास मदत झालेली होती. महाराष्ट्रातील महिला समाजसुधारकांप्रमाणेच डाध्घी बेझंट या स्त्रियांच्या हक्कांसाठी उत्साहाने लढणाऱ्या नेत्या होत्या. तोरुदत्त, स्वर्णकुमारी देवी, भगिनी निवेदिता या समाजसुधारक महिलांनीही स्त्री सुधारणा चळवळीत मोलाचे योगदान दिलेले होते. एकूणच एकोणिसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळीचे विवेचन करताना असे दिसून येते की, १९व्या शतकातील सामाजिक सुधारणेच्या चळवळीत उदारमतवादी स्त्रीवादाची बीजे होती. परंतु हिंदू

पुनरुज्जीवनवादाने भारलेल्या सनातनी सुधारणावादाने त्यावर मात केली. अशा सुधारकी प्रयत्नात स्त्रियांची दडपणूक करणाऱ्या संस्थांना आव्हान दिलेले नव्हते. अशा प्रयत्नांमध्ये स्त्रियांसाठी जरी अनेक संस्था व संघटना स्थापन झाल्या तरी त्यांचे दुय्यमत्व नाहीसे झालेले नव्हते. मध्यमवर्गीयांच्या कौटुंबिक सुधारणा असे अधिष्ठान त्या सुधारणांना लाभलेले होते. परंतु विसाव्या शतकामध्ये महात्मा गांधीजींनी स्त्रियांना जेव्हा राष्ट्रीय चळवळीत सहभागी करून घेतले. तेव्हा खऱ्या अर्थाने स्त्रियांची स्वातंत्र्यशीलता भारतात प्रत्ययास आली.

विसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळ –

समाज सुधारणा चळवळीतून झालेल्या स्त्री शिक्षण प्रसारामुळे डॉक्टर्स, वकील, शिक्षक आणि विचारवंत स्त्रियांची पहिली पिढी भारतात निर्माण झाली. १९ व्या शतकाच्या अखेरीस ब्राह्मो समाज, आर्य समाजच्या प्रभावाखाली मद्रास, मुंबई, बंगाल अशा विविध प्रांतातून सुशिक्षित स्त्रियांच्या अनेक सुधारणावादी संघटना निर्माण झाल्या. भारतातील शहरी भागात लक्षणीय संख्येत स्त्रियांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या संघटना सुरू झाल्या. १९२० साली महात्मा गांधीजींचा भारतीय राजकारणात प्रवेश झाल्यानंतर जी राजकीय परिस्थिती निर्माण झाली तिचा भारतभरच्या स्त्रियांवर मोठा परिणाम झालेला होता. गांधीजींनी शिक्षणाबरोबरच स्त्रियांची सामाजिक कर्तव्येही समाजाच्या नजरेस आणून दिलेली होती. महात्मा गांधीजींनी नव समाज निर्मितीत स्त्रीची महत्वाची भूमिका स्पष्ट करून स्त्रियांना राजकीय, सामाजिक, उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास आवाहन केलेले होते. स्त्रिया सुतकताई, स्वदेशी प्रचार, निदर्शने यामध्ये मोठ्य प्रमाणावर सहभागी होऊ लागल्या. विविध क्षेत्रात काम करण्याची ओढ स्त्रियांमध्ये निर्माण होत होती. त्याचवेळी हिंदू महासभेची स्त्री शाखा निर्माण होऊन स्त्रियांच्या परिषदा अधिवेशने यांना चालना मिळू लागली. त्याद्वारे स्त्रियांनी राजकीय क्षेत्रात प्रत्यक्ष कार्य करण्यास सुरुवात केली. राजकीय क्षेत्राबरोबरच भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातही स्त्रिया हिरिरीने सहभागी होत होत्या. यातीलच एका स्त्री नेतृत्वाचे उदाहरण म्हणजे सरोजनी नायडू. सरोजिनी नायडू या भारतीय स्वातंत्र्य लढ्यतील एक थोर कार्यकर्त्या, प्रभावी वक्त्या व कवयित्री होत्या. १९०८ मध्ये विधवाविवाह परिषदेत त्यांनी स्त्रियांच्या चळवळीचा पाया घातला. येथूनच त्यांच्या स्त्री विषयक चळवळीला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा, खिलाफत चळवळ, गोलमेज परिषद, सविनय कायदेभंग, दांडी यात्रा, धारासना येथील मिठागारावर झालेल्या सत्याग्रहाचे नेतृत्व, भारत छोडो आंदोलन, भारतीय महिलांना मताधिकार इ.राजकीय व सामाजिक कार्यात त्यांनी पुढाकार घेतला. गव्हर्नर पदी यशस्वी कारकिर्द पार पाडल्याबद्दल त्यांच्या चरित्रकार पद्मिनी सेनगुप्ता त्यांच्या कार्याचा गौरव करताना म्हणतात, "She proved to be one of the most outstanding governors of the first days of free India"

राष्ट्रीय चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाबद्दल बऱ्याचदा या स्त्रिया स्त्रीवादी किती व राष्ट्रवादी किती होत्या हा प्रश्न उपस्थित केला जातो. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीच्या उद्दिष्टाने प्रेरित होऊन साम्राज्यवादी व्यवस्थेला आव्हान देण्याबरोबरच मतदानाचा हक्क आणि घटनेतील समानतेच्या हक्काची हमी यासारखे मुद्दे लक्षात घेतले असता स्त्रियांचा अग्रक्रमही प्राधान्याने लक्षात येतो. महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली जरी स्त्रीया घराबाहेर पडून सार्वजनिक कार्यात उतरू लागल्या तरीही गांधींच्या स्त्रियांच्या भूमिकेबद्दलच्या विचारांचे मूळ हिंदू पुरुष प्रधानतेतच होते. म्हणून त्यांनी स्त्रियांना आदर्श माता बनून नीतिमान, चारित्र्यसंपन्न बनविण्याची तसेच घराघरातून चरख्याच्या माध्यमातून स्वदेशीचा मूलमंत्र अवलंबिण्याची जबाबदारी दिली होती. एकूणच राष्ट्रीय चळवळीत स्त्रियांकडे घराचे घरपण टिकविणाऱ्या या प्रतिमेतून पाहिले गेले. १९०८ पासून कामगार लढ्यामध्येही स्त्रिया मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊ लागलेल्या होत्या. १९२८ – २९ चा मुंबई गिरणी कामगार संपात स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी होत्या. भारतात १९३० सालानंतर कम्युनिस्ट विचारांच्या मंडळींनी स्त्री प्रश्नासंदर्भात भूमिका घ्यायला सुरुवात केली. त्यावेळी मणीबेन कारा, उषाताई डांगे, संतोष कुमारी देवी, प्रभावती देवी, यांसारख्या स्त्रियांनी कामगार संघटनेच्या प्रतिनिधी म्हणून काम करण्यास सुरुवात केलेली होती. स्वातंत्र्य चळवळी बरोबरच

डाव्या विचारसरणीच्या श्रमजीवींच्या संघटनाही कॉ. डांगे कॉ.मिरजकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या होत्या. या चळवळीतही स्त्रिया सहभागी होत्या.

स्वातंत्र्योत्तर भारतातील स्त्रीवादी चळवळ –

विसाव्या शतकाच्या मध्यावर १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा स्वीकार केला. स्वतंत्र भारताच्या घटनेने आपण स्त्री – पुरुष भेद मानत नाही असे जाहीर केले होते. घटनात्मक तरतुदीनुसार कोणताही भेदभाव न करता पुरुषांप्रमाणे स्त्रियांना मतदानाचा अधिकार कायदेशीर दृष्ट्या दिलेला होता. तसेच स्त्रियांना सामोरे जावे लागणाऱ्या अन्याय रूढींचे निराकरण करण्याच्या दृष्टीने ४२ व्या घटनादुरुस्तीने कलम चार मध्ये दहा नवीन कर्तव्ये सांगितली होती. त्यामध्ये स्त्रियांविषयी कलम होते, ष्स्त्रियांच्या प्रतिष्ठेला मारक ठरणाऱ्या सर्व चालीरीतींचा त्याग करणे

भारतातील स्त्री चळवळीचा मागोवा स्वातंत्र्यपूर्व काळ व स्वातंत्र्योत्तर काळ अशा दोन टप्प्यात स्वतंत्रपणे घ्याव्या लागतो. या दोन टप्प्यात स्त्रीवादी चळवळीत असणारे सातत्य व समान सूत्र देखील लक्षात घेणे आवश्यक आहे. वसाहत काळापासून स्त्रियांचे कुटुंबातील स्थान, दुष्ट प्रथा, परंपरा, त्याचबरोबर जाती व्यवस्थेतून त्यांचे होणारे शोषण, स्त्री शिक्षण इत्यादी कळीचे मुद्दे होते. वरील पार्श्वभूमीवर स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या स्वतंत्र संघटना स्थापन व्हायला सुरुवात झाली. स्त्रिया विभिन्न चळवळींमधून कृतिशीलपणे सहभागी होऊ लागल्या. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्या काही वर्षात फोल आशावादातून निष्क्रियता दिसून आली. भारतीय राज्यघटनेने सर्व प्रौढ स्त्री – पुरुषांना शिक्षणाचा, मतदानाचा समान हक्क दिलेला होता. राजकीय व सामाजिक क्षेत्रात स्त्रियांना घटनेद्वारे पुरुषांइतकेच समान हक्क मिळाले. पंचवार्षिक योजना, मिश्र अर्थव्यवस्था, शासनाने साहाय्य केलेली महिला व बालकल्याणकारी कार्ये हा स्वातंत्र्योत्तर भारतीय विकास योजनांचा गाभा होता. स्वातंत्र्योत्तर काळात पंचायत राज व नगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांतून स्त्रियांचा राजकारणातील सहभाग दृश्य झाला. स्वातंत्र्योत्तर भारतात सुरुवातीच्या २५ वर्षांच्या काळात स्त्रियांचा सामाजिक सहभाग महिला मंडळे व महिला परिषदांपुरता मर्यादित होता. स्वातंत्र्यानंतर स्त्रियांचे हक्क, अधिकार, सामाजिक सुरक्षा, आरोग्य इत्यादी विषयीची जाणीव जसजशी विकसित होत गेली तसतसे कायदे तयार होऊ लागले. स्वातंत्र्योत्तर काळातील कायद्यांची सुरुवात हिंदू कोडबिलाने झाली. हिंदू कोड बिल म्हणजे, ष्स्त्रीला भारताच्या सामाजिक इतिहासात प्रथमच विवाह, वारसा, घटस्फोट, पोटगी, दत्तक, इ. संदर्भात जाती निरपेक्ष अधिकार देते. या सर्व संदर्भातील पुरुषसत्ताक जुलूमशाहीतून मुक्त करणारी अखिल भारतीय स्तरावरील ही पहिली कुटुंब सुधारणा होती.ष्क

१९५० च्या दशकात भारतीय स्त्री चळवळीतील लढाऊ कामाचा जोर कमी झाला. मात्र १९६० नंतर म्हणजेच महायुद्धोत्तर स्त्रीवादी चळवळीची दुसरी लाट आली. जनवादी आंदोलनांमधून स्त्रियांचा चळवळीतील सहभाग दिसू लागला. १९७० च्या दशकात सर्वोदय चळवळ, साम्यवादी चळवळ अशा अनेक चळवळींतून लोकांना जागृत करून त्यांच्या हक्कांसाठी लढे उभारले गेले. या सर्व पर्यायी विकासकामांत, जनआंदोलनात व लढ्यात मध्यम वर्गातील व कामगार वर्गातील स्त्रियांनी मोठ्य संख्येत व लढाऊ बाण्याने भाग घेतला. भारतातील स्त्रियांच्या दर्जा विषयीच्या समितीने जो अहवाल सादर केला त्याला समानतेच्या दिशेने या नावाने ओळखले जाते. हा अहवाल ३१ डिसेंबर १९७४ रोजी प्रसिद्ध झाला. हा अहवाल म्हणजे, ष्स्त्रीच्या प्रश्नाकडे बघण्यासाठी एक नवीन दृष्टी देणारा, स्त्रियांना सर्व पातळ्यांवर दिल्या जाणाऱ्या दुय्यम व अधोरी वागणुकीची चिकित्सक मांडणी करणारा होता.

इसवी सन १९७५ हे वर्ष युनोने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले. या वर्षाच्या निमित्ताने भारतीय स्त्रियांमधील असंतोष स्फोटक स्वरूपात व्यक्त होऊ लागला. इसवी सन १९७५ ते १९८५ हे दशक युनोने आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून घोषित केले. या काळात जगात विविध ठिकाणी झालेल्या महिला परिषदांनी स्त्रीवादी चळवळीला आणखी बळकटी आणली. १९७५ नंतर खऱ्या अर्थाने भारतातील आणि विशेषत: महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीला व्यापक स्वरूप प्राप्त झाले.

निष्कर्ष –

१) पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाची कारणमीमांसा स्पष्ट करण्याच्या दृष्टीने स्त्रीवादी चळवळीचा उदय झाला.

२) १९ व्या शतकातील समाज सुधारणा चळवळीत स्त्रियांना काही हक्क मिळाले पाहिजेत या दृष्टिकोनातून स्त्री सुधारणावादी चळवळ सुरू झाली.

३) एकोणिसाव्या शतकातील सामाजिक सुधारणा चळवळीत जागृत महिला समाजसुधारकांनी मोलाचे योगदान दिले.

४) विसाव्या शतकात भारतीय स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

५) स्वातंत्र्योत्तर काळात विविध सामाजिक चळवळींतून स्त्रियांची कृतिशीलता निदर्शनास येते.

संदर्भ टिपा –

१) पद्मजा पाटील, शोभना जाधव, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, मार्च २००७. पृ.२८०.

२) प्राचीन चिकटे (अनु.), भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, २००८, पृ.१२६.

३) सावित्रीबाई फुले, काव्यफुले, पुणे, १८५४, पृ१७.

४) सरल धारणकर, आधुनिक भारतातील स्त्री जीवन,य.च.म.मु विद्यापीठ, नाशिक, प्रथम प्रकाशन, २००४, पृ.३३.

५)A-N-Dwivedi Sarojini Naidu and her poetry kitab mahal Allahabad]first edition,१९८१..४६.

६) स्वाती कर्वे, स्त्री विकासाचे नवे क्षितिज, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००८,पृ.१६.

७) प्रतिमा परदेशी, सरोज कांबळे, जातीव्यवस्था आणि स्त्री मुक्ती, क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, १९१९,पृ. २८.

८) भा.ल.भोळे, शतकांतराच्या वळणावर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, प्रथमावृत्ती, २००६,पृ. ७०.

❑❑❑